# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

## कुलगुरुपदासाठी जाहिरात

कुलगुरु पदाकरिता शोध समितीकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, हे महाराष्ट्रातील चार कृषी विद्यापीठांपैकी एक असुन कोकण विभागाच्या कृषी व संलग्न क्षेत्रांमध्ये अध्यापन,संशोधन आणि विस्तार शिक्षण यांच्या गरजा भागविण्यासाठी या विद्यापीठाची दिनांक १८ मे १९७२रोजी स्थापना करण्यात आलेली आहे. कोकण विभागामधील सात जिल्हे हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. या विद्यापीठा अंतर्गत ७ घटक (कॉन्स्टीटयुएन्ट) व २१ खाजगी-कृषी व संलग्न विद्या शाखेतील महाविद्यालये असून त्यांचे मार्फत विद्या वाचस्पती पदवीसह पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविले जातात. विद्यापीठाचे संशोधन कार्य १९ संशोधन केंद्रांमार्फत स्थानिक गरजा व संशोधनाची आवश्यकता विचारात घेऊन केले जाते.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ मध्ये शासनाने केलेल्या तरतुदी प्रमाणे कुलगुरु पदावरील निवड प्रक्रिया पुर्णपणे पारदर्शक व वस्तुनिष्ठ असावी हा त्या मागील उद्देश आहे. कुलगुरु पदावर नियुक्त होणारी व्यक्ती ही प्रख्यात विद्वान असेल, विद्यापीठाला व्यावसायिक व अधिक प्रगत बनविण्याचे नेतृत्व गुण आणि उत्तम प्रशासकीय क्षमता असणारी असेल, ज्याद्वारे ती विद्यापीठाला शैक्षणिक आणि व्यावसायिक दृष्टया सर्वोत्कृष्ट दर्जाचे केंद्रबनवेल.

महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल व कृषी विद्यापीठाचे कुलपती यांनी कुलगुरुंच्या पदासाठी विख्यात कृषीशास्त्रज्ञ / विद्याव्यासंगी व विद्यापीठास शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचे अत्युच्च केंद्र बनविण्यासाठी क्षमता असलेल्या व कोकण क्षेत्रातील कृषी विषयक संशोधनाच्या गरजा पूर्ण करण्याची क्षमता असलेल्या व्यक्तीची शिफारस करण्याकरीता शोध समिती स्थापित केली आहे.

सदर शोध समिती, महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ व त्यात शासनाच्या दिनांक २१ जुलै २०१० ते १३ ऑक्टोबर २०२० पर्यंतच्या आदेशान्वये घोषित केलेल्या कुलगुरु पदासाठी विहीत केलेली अर्हता व अनुभव यांची पुर्तता करणा-या आणि हे आव्हान स्वीकारण्यास इच्छुक भारतीय नागरिकत्व असलेल्या प्रख्यात कृषी शास्त्रज्ञ / शिक्षण तज्ञ व्यक्ति यांच्याकडून नामनिर्देशने /आवेदन पत्रे मागवित आहे. या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता, अपेक्षित अनुभव, इच्छित कौशल्ये आणि क्षमता इत्यादी बाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) **(www.dbskkv.org)** आणि महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे **(www.mcaer.org)** या संकेत स्थळांवर (वेबसाईटवर) उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर पदासाठी इच्छुक व्यक्तींनी विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमुन्यात अर्जाच्या सॉफ्ट कॉपीसहीत (MS Word) त्यांच्या उमेदवारीच्या पुष्ठ्यर्थ दोन पानी समर्थन, तसेच दोन पानी त्यांची विद्यापीठाच्या उत्कर्षाबाबत दुरदृष्टी आणि त्यांच्या कार्याशी परिचित असणा-या तीन प्रसिध्द व्यक्तींची नावे व त्यांची पत्रे यांसह स्वत:ची तपशीलवार माहिती देऊन अर्ज करावेत. संस्था देखील वरील अर्हता प्राप्त योग्य असा उमेदवार नामनिर्देशित करु शकतात.

शोध समितीने डॉ. एन. पी. साहू, सहसंचालक, केंद्रीय मत्स्य शिक्षणसंस्था (CIFE), भारतीय कृषि अनुसंधान परिषद, भारत सरकार, वर्सोवा, मुंबई यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

इच्छुक उमेदवारांनी अंतिम दिनांक ०३/०४/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोडल अधिका-याकडे नामनिर्देशने /आवेदन पत्रे खालील पत्त्यावर पाठवावीत.

डॉ. एन पी. साहू,
सहसंचालक, केंद्रीय मत्स्य शिक्षणसंस्था,
पाचमार्ग, यारीरोड, वर्सोवा, मुंबई - 400 061
भ्रमणध्वनी - 9869120627
ई–मेल :–nodalbskkvdapoli@gamil.com

मुदती नंतर प्राप्त होणा-या नामनिर्देशनांचा/आवेदनपत्रांचा विचार केला जाणार नाही. आवेदन पत्र सादर करताना पाकिटावर **"कुलगुरु, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली पदाकरिता अर्ज"** असे ठळकपणे नमुद करावे. शोध समितीला आवश्यकता भासल्यास निवड योग्य उमेदवारांना त्यांच्याबरोबर वैयक्तिक पातळीवर विचार विनिमय करण्यासाठी आमंत्रित करण्यात येईल.

भारतातील एका अत्यंत प्रगतशील राज्यामध्ये कृषी शिक्षण, विस्तार व संशोधन या क्षेत्रातील नवनवीन कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी/ राबविण्यासाठी शैक्षणिक प्रशासकांना ही एक सुसंधी आहे.

**अध्यक्ष,**
**शोध समिती**

दिनांक: 03/ 03/ 2023
स्थळ:मुंबई

**टीप: या संदर्भात इंग्रजीमध्ये दिलेली जाहिरात सर्वार्थी अंतिम धरली जाईल.**